# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त ‘डी’ विभाग यांचे कार्यालय, जोबनपुत्र कंम्पाऊंड, नानाचौक, ग्रँट रोड, मुंबई-४०० ००७.

क्र. स.आ.डी./ ४०७ /सहा.अभि.( घ.क.व्य.) डी / दि. २९/०७/२०२५

## स्वारस्य अभिव्यक्ती

‘डी विभागात ‘मलनि:सारण चौक्यांमध्ये रिक्त असलेल्या कामगारांच्या पदी विभागातील दैनंदिन मलनि:सारण खात्याशी संबंधीत कामे करण्याकरीता कंत्राटी कामगार पुरविण्यासाठी नोंदणीकृत अशासकीय संस्थांची नेमणूक करण्याबाबत या कामासाठी इच्छुक संस्थांकडून त्यांची पात्रता यादी तयार करून अर्ज मागवित आहे. सदर अशासकीय संस्थांना मलनि:सारण खात्याशी संबंधीत साफ सफाईची कामे, जलनि:सारण खात्याशी संबंधीत साफ सफाईची कामे किंवा घन कचरा व्यवस्थापन खात्याशी संबंधीत साफ सफाईची कामे करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

इच्छुक अशासकीय संस्थांनी याबाबतचा तपशील, अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी रु. ८६००/- (रु. ७२६० /- + १८ % जी.एस.टी.) एवढी रक्कम नागरी सुविधा केंद्रामध्ये भरणा केल्यानंतर सहा. अभियंता (घकव्य) ‘डी’ विभाग यांच्या कार्यालयात दि. ३०.०७.२०२५ ते दि. ०५.०८.२०२५ पर्यंत सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल. डी विभागात मलनि:सारण खात्याशी संबंधीत साफ सफाईची कामे, जलनि:सारण खात्याशी संबंधीत साफ सफाईची कामे किंवा घन कचरा व्यवस्थापन खात्याशी संबंधीत साफ सफाईची कामे करण्याचा अनुभव असणाऱ्या संस्थांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

संस्थेने ‘डी’ विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. ०५/०८ /२०२५

( दु.०१.०० वाजेपर्यंत) आहे.

सही/-

**सहाय्यक अभियंता ( घ.क.व्य.) ‘डी’ विभाग**